दि.२७ व २८ मार्च, २०२६ या कालावधीत Excellence in Medical Sciences and Reforms in Medical Educations-Conclave करिता विशेष प्रसिद्धी मोहिमेच्या अंतर्गत व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यासाठी रु.३.६२ कोटी (सर्व करांसहित) इतक्या अंदाजित खर्चास व आराखडयास (विशेष प्रसिध्दी मोहिम) सन २०२६-२७ या वर्षात कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. मावज-२०२६/प्र.क्र.३२/मावज-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १८ मे, २०२६

**संदर्भ** :- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-०३२५/प्र.क्र.७९/प्रशासन-२, दि.२० जानेवारी, २०२६
२) दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजीची मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेची टिप्पणी
३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. वृत्तचित्र २०२५-२०२६/ Medical Conclave/का-७/४५२, दिनांक २०.०३.२०२६

**प्रस्तावना :-**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत दि.२७ व २८ मार्च, २०२६ या कालावधीत Excellence in Medical Sciences and Reforms in Medical Educations-Conclave आयोजन करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील दि.२०/०१/२०२६ चे शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर कार्यक्रमाच्या आयोजन करण्याकरीता येणा-या रु. ३.६२ कोटी (अक्षरी रुपये तीन कोटी बासष्ट लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या माध्यम आराखडयास संदर्भ क्र. २ येथील दि.११ फेब्रुवारी, २०२६ च्या टिप्पणीनुसार मान्यता देण्यात आली आहे.

उक्त परिषदेची व्यापक प्रसिध्दी करण्याकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा संदर्भाधिन दि. २० मार्च, २०२६ चा प्रस्ताव विचारात घेऊन एकुण रु.३.६२ कोटी (सर्व करांसहित) (अक्षरी रुपये तीन कोटी बासष्ट लक्ष फक्त) इतक्या खर्चास व आराखडयास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संदर्भाधिन दि. २० मार्च, २०२६ च्या पत्रान्वये रु.३.६२ कोटी (सर्व करांसहित) इतक्या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर अंदाजित खर्चास व त्याच्या आराखडयाच्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मावज-२०१८/प्र.क्र.२३९/३४, दि.२६/०३/२०२० नुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग दोन, प्रपत्र-अ, अ.क्र.१ अन्वये अ) वृत्तपत्रे अथवा अन्य छापील जाहिरातीसाठी (वितरण), ब) दूरचित्रवाणी, क) टिव्हीसी, अ.क्र.२ अन्वये अ) रेडिओ, ब) समाज माध्यमे, क) छापील माध्यमांकरिता, अ.क्र.३ अन्वये अ) सार्वजनिक फलक, ब) बाह्य माध्यमे, अ.क्र.४ अन्वये अ) संप्रेषण माध्यमे (कम्युनिकेशन) मेळावे, परिषदा, गटचर्चा, ब) लाईव्ह मिडीया (पथनाट्य, लोककला आदीद्वारे शासकीय योजनांबाबत जनजागृती), अ.क्र.५ अन्वये नवीन शक्तो अ) अन्य माध्यमे कुपन्स (रेल्वे तिकिटे, पोस्ट कार्ड, अन्य कुपन्स अथवा प्रवेश पत्रिका) शासकीय संदेशाचे प्रसारण, ब) अन्य माध्यमे (वरील संवर्गात न येणारी मात्र प्रभावी ठरणारी परंपरागत व आधुनिक माध्यमे) माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समिती यांनी तयार केलेल्या आराखड्यानुसार, अ.क्र.६ नवीन शक्ती प्रभाव अजमावणी (इम्पॅक्ट असेसमेंट / प्रतिसाद अहवाल / फिडबॅक रिपोर्ट) या माध्यंमाद्वारे येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. सदर शासन निर्णयान्वये विभाग प्रमुख व प्रशासनिक विभागास असलेले वित्तीय अधिकार नमूद करण्यात आलेले आहेत. सदर खर्चास तातडीची बाब म्हणून महासंचालनालय स्तरावरुन मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात आली असून सदर अभियानांतर्गत होणारा अंदाज खर्च विभाग प्रमुख व प्रशासनिक विभागास असलेल्या वित्तीय अधिकार मर्यादेपेक्षा अधिक असल्यामुळे नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तावाधीन सर्व बाबींची खातरजमा महासंचालनालयाकडून करण्यात यावी.

२) प्रस्तावाधीन खर्च इतर लेखाशीर्षामधून भागविण्यात येत नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी महासंचालनालयाची राहील.

३) सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची दक्षता महासंचालनालयाने घ्यावी.

४) सदर रकमा अदा करतांना विहित कार्यपध्दतीने अनुपालन करण्याची तसेच सदर खर्चाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी महासंचालनालयाची राहील.

५) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार/कार्यपध्दतीनूसार/आदेशानुसार कार्यवाही झाल्याचे तपासून देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबतची देयके यापूर्वी अदा करण्यात आली नसल्याची खातरजमा करण्यात यावी.

**३.** उपरोक्त खर्च सामान्य प्रशासन विभाग मागणी क्र.ए-६, २२२०-माहिती व प्रसिध्दी, ६० इतर**,** १०१ जाहिरात व दृक प्रसिध्दी (००) (०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिध्दी मोहीम (कार्यक्रम)**,** २६ जाहिरात व प्रसिध्दी (संगणक सांकेतांक क्र. २२२०११७५) या लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून बीम्स प्रणालीवर उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत करण्यात यावा.

**४.** सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.९३/का.१४४३**,** दि.३१.३.२०२६ अन्वये तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२९९/व्यय-४**,** दि.२९/०४/२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार संदर्भाधिन दि.२०.०३.२०२६ च्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१८१२३२१६१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SARIKA UTTAM PATIL

Digitally signed by SARIKA UTTAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=aa374b566d78c73e42804a2013f949268134e97ca9f7b2458c4247baf4c72175, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6401C88A0E0E14D8299DD0F14BA71419FCC6EE4670C193CBF1EB58127FA5947D, cn=SARIKA UTTAM PATIL
Date: 2026.05.18 12:39:29 +05'30'

**( सारिका उ. पाटील )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व मा. विधान परिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८) सहसचिव, वित्त विभाग (कार्या-व्यय-४), मंत्रालय, मुंबई - ३२.
९) सहसचिव, नियोजन विभाग (कार्या-१४४३), मंत्रालय, मुंबई-३२
१०) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई.
११) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१२) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), मुंबई, नागपूर,
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१५) लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) लेखाधिकारी (आहरण व संवितरण) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(२ प्रती)
१७) लेखाधिकारी (अर्थसंकल्प), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१८) निवडनस्ती (मावज-१). सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई